# ह्युम आणि हिंदुस्थान

**मारुती अवदी**

इंग्रज हिंदुस्थानात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते झाले. एकेकाळच्या या महान राष्ट्रात ब्रिटिश साम्राज्याची उभारणी झाली. १८५७ मध्ये हिंदुस्थानी राष्ट्रभक्तांनी स्वातंत्र्ययुध्द पुकारले. या स्वातंत्र्ययुध्दाची मंगल नांदी मंगल पांडे या साध्या सैनिकाने केली. मंगल पांडे हाच आधुनिक हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा खरा शिल्पकार होय. ब्रिटिशांनी हिंदुस्थानची आशा सोडली. 'शिर सलामत तो पगडी पचास' म्हणून मी मी म्हणणारे ब्रिटिश सेनापती सैरावैरा पळाले. पण हिंदुस्थानीयांचा सर्वोच्च दुर्गुण ब्रिटिशांसाठी वरदान ठरला. तो म्हणजे फितुरी. देशांतर्गत फितुरी मुळेच परकीय आक्रमक हिंदुस्थान पादाक्रांत करू शकले हे ऐतिहासिक सत्य आहे.

१८५७ मध्ये हिंदुस्थानच्या या दुखण्याची नाडी ब्रिटिशांना मिळाली. धूर्त ब्रिटिशांनी आपली चाल आणि खेळी बदलली. हिंदुस्थानात 'काळे इंग्रज' तयार केल्याशिवाय ब्रिटिश साम्राज्य टिकणार नाही हे त्यांना समजले. त्यासाठी इंग्लीश भाषेतूनच इंग्लिश पध्दतीचे शिक्षण हिंदुस्थानीयांवर सक्तीने लादणे अत्यंत गरजेचे ठरले.. ताबडतोब ब्रिटिशांनी कलकत्ता, मद्रास आणि मुंबईत विद्यापीठे स्थापन केली. हिंदुस्थानीयांपुढे सरकारी नोकरीस मोठे हुद्दे, मोठे पगार आणि व्यापार व व्यवसायात भरपूर पैसे मिळवून विलासी जीवन जगण्याची प्रलोभने ठेण्यात आली पण प्रलोभनांची पूर्तता दोन अटीवर अवलंबून ठेवली. त्या म्हणजे ब्रिटिश सत्तेविषयी संपूर्ण निष्ठा आणि ब्रिटिशांनी स्थापलेल्या विद्यापीठांची पदवी.

ही कुटील नीती खुद्द ब्रिटिशांच्या अपेक्षेपेक्षाही लवकर यशस्वी झाली. इंग्लीश शिक्षण म्हणजे 'वाघिणीचे दूध' असे हिंदुस्थानीच म्हणू लागले. ज्या देशाला जग 'ज्ञानीयांचा देश' म्हणून ओळखत होते, त्याच देशातले लोक इंग्लीश किंवा अमेरिकन विद्यापीठाची एखादी पदवी मिळविणे म्हणजे ज्ञानाचे परमोच्च शिखर गाठणे असे समजू लागले. साहजिकच इंग्लंडचे सुदैव हे हिंदुस्थानचे दुर्दैव ठरले. 'वाघिणीचे दूध' पिऊन हिंदुस्थानात फक्त 'बोकड' तयार झाले. हॅट आणि टाय, सूट आणि बूट घालून हे 'बोकड' मायबाप ब्रिटिश सरकारचे निष्ठावंत सेवक आणि लब्ध प्रतिष्ठित नागरिक म्हणून मिरवू लागले.

अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिंदुस्थानची अधोगती आणि हिंदुस्थानीयांचे अंध:पतन बघून ज्या व्यक्तीला अतिशय दु:ख झाले, तो एक इंग्रज होता. त्याचे नाव 'ॲलन ऑक्टोव्हिअन ह्युम' (Allen Octovian Hume). या इंग्रजाने हिंदुस्थानला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी पहिले पाऊल टाकले. ह्युम हिंदुस्थानात १८४९ मध्ये आले. ते आय. सी. एस. अधिकारी होते. १८४९ ते १८८२ पर्यंत त्यांनी ब्रिटिश सरकारची नोकरी केली. निवृत्तीनंतर ह्यूम मायदेशी परतले नाहीत. ते शिमल्याला स्थायिक झाले आणि त्यांनी आपले जीवन हिंदुस्थानच्या सेवेस वाहिले. ह्युमला हिंदुस्थानीयांच्या राष्ट्रभक्तीचे अचूक आकलन झाले होते. हिंदुस्थानी हलाखीचे गरीब असले तरी त्यांचे राष्ट्रप्रेम वादातीत आहे. हे गरीब प्रसंगी आपले प्राण देतील पण आपले राष्ट्र कधीही विकणार नाहीत. हिंदु संस्कृती हाच हिंदुस्थानचा प्राण आहे. म्हणून कुठल्याही परकीय आक्रमकाला आणि कुठल्याही परकीय संस्कृतीला हिंदुस्थानी जनतेचे प्रेम आणि निष्ठा कधीही मिळणार नाहीत. त्याच बरोबर ह्युमने ओळखले की जर हिंदुस्थानात १८५७ ची पुनरावृत्ती झाली तर ती ब्रिटिश आणि हिंदुस्थानियांना सारखीच मारक होईल. हिंदुस्थानी राष्ट्रभक्तीचा प्रवाह योग्य दिशेने जाण्यासाठी एका कुशल संघटनेची अत्यंत जरूरी होती.

१८८३ मध्ये मार्च महिन्याच्या एक तारखेस ह्युमनी एक प्रभावी पत्र कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना उद्देशून लिहिले. त्यांनी पन्नास पदवीधर स्वयंसेवकाची मागणी केली. त्या पत्रातले विचार आजसुध्दा अत्यंत वेधक आणि बोधक आहेत. ह्युम म्हणाले, 'जरी माझ्यासारखे परकीय हिंदुस्थानावर नितांत प्रेम करत असले तरी हिंदुस्थानच्या उध्दाराचे खरे काम हिंदुस्थानीयांनीच केले पाहिजे. हे काम करण्यास जर आज पन्नास स्वयंसेवक मिळत नाहीत, पन्नास जण स्वखुशीने पुढे येत नाहीत, गरज पडलीच तर पन्नास जण आपले सर्व आयुष्य या एकाच कामासाठी समर्पित करण्यास तयार नसतील तर हिंदुस्थानला भविष्यकाळ नाही. आज आणि उद्या हिंदुस्थानी दीनदुबळे आणि लाचार म्हणूनच जगतील. स्वत:च्याच देशात ते परकीयांच्या हातातील कळसूत्री बाहुली होतील आणि जग हिंदुस्थानाला फक्त गुलामांचा देश म्हणूनच ओळखतील.' या पन्नास स्वयंसेवकांच्या अंगी तीन गुण असलेच पाहिजेत असे ह्युमनी

(पान १७ पाहा)

# ह्यूम आणि हिंदुस्थान

(पान ६ वरून)

निर्भिडपणे जाहीर केले. ते तीन गुण म्हणजे स्वार्थाचा संपूर्ण त्याग, प्रखर राष्ट्रभक्ती आणि हिंदु संस्कृतीचा गर्व.

ह्युमच्या कार्यामुळे २८ डिसेंबर १८८५ मध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली सतत २३ वर्षे ह्युम कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी होते. पहिल्या पाच वर्षात कॉंग्रेस तत्कालीन ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनच्या (lord Dufferin) तालावर नाचली. पण पाच वर्षानंतर चित्र बदलले. कॉंग्रेसमध्ये मवाळ आणि जहाल असे दोन गट पडले. मवाळ हे आधी स्वतःचा स्वार्थ आणि मग परमार्थ आणि फावल्या वेळात देशभक्ती ह्या तत्वाचे उपासक तर जहाल हे राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि जनतेच्या सर्वांगिण उत्कर्षासाठी स्वतःच्या संसाराचीही होळी करणारे आणि स्वतःच्या प्राणाची आहुती देणारे जाज्वल्य देशभक्त होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य ही 'देवाचीच देणगी' हे मवाळांचे ब्रीदवाक्य होते. मायबाप इंग्रज सरकारच्या कृपाछत्राखाली हिंदुस्थानीयांना मुबलक सरकारी चाकऱ्या आणि विधिमंडळामध्ये स्वतःच्या नेमणुका हीच मवाळांची मुख्य ध्येये होती. ती साध्य करण्यासाठी ब्रिटिशांची सदोदित 'प्रार्थना आणि याचना' हेच मवाळांचे मार्ग होते.

अत्यंत क्षुद्र ध्येये आणि भिक मागून केव्हाच कुठल्याही राष्ट्राला स्वातंत्र्य मिळत नसते. हे जहालांचे ठाम मत होते. हिंदुस्थानी जनतेला स्वराज्याचा श्रीगणेशा हिंदुस्थानच्या ज्या महान सुपुत्रांनी शिकविला ते म्हणजे स्वामी दयानंद सरस्वती, बंकीमचंद्र, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, लाला लजपत राय, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, योगी अरविंद घोष आणि महात्मा गांधी. हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य हे 'सैतानाचे राज्य' आहे असे महात्मा गांधींनी ठणकावून सांगितले होते.

खुद्द ह्युमना मवाळांच्या संधीसाधूपणाची किव आली. मवाळ्यांच्या मिळमिळीतपणाची अत्यंत किळस आली. त्यांनी मवाळांची निर्भत्सना केली. ह्युम म्हणाले, 'राजमुकुट घालण्यासाठी आणि राजसत्ता ग्रहण करण्यासाठी तुमची अधिरता शिगेला पोचली आहे. उतावीळ नवरा जसा गुडघ्याला बाशींग बांधून मंडपात येतो, तसेच मंत्री होण्यास तुम्ही उतावीळ झालेले आहात. पण राजलक्ष्मी प्रसन्न होण्यासाठी जे शौर्य अंगी असावे लागते आणि जो त्याग करावा लागतो तो तुमच्या कार्यात कुठेही दिसत नाही. ब्रिटिश संगीन दिसताच तुम्ही चळाचळा कापता आणि स्वप्नातसुध्दा 'काळे पाणी' शब्द ऐकताच पळू लागता. तात्पर्य मवाळ हे ब्रिटिश राजसत्तेचे अक्षरशः हुजरे बनले.

जगाचा इतिहास सांगतो की वसाहतवाद्यांच्या पार्लमेंटमध्ये किंवा नॅशनल असेंब्लीमध्ये गुलामांनी वसाहतवाद्यांच्या भाषेतून केलेल्या फर्ड्या भाषणांनी कुठल्याही राष्ट्राला केव्हाही स्वातंत्र्य मिळत नसते. भाषण बहाद्दर हे सहसा सच्चे स्वातंत्र्यवीर नसतात. ते हाडाचे चाकर असतात. सच्चे स्वातंत्र्यवीर आपले तन मन आणि धन स्वातंत्र्यदेवतेच्या चरणांशी 'समर्पित करतात आणि तेव्हाच परकीय आक्रमक आणि वसाहतवादी पळून जातात. १८५७ आणि १९४७ मध्ये अशा महान राष्ट्रभक्तांनी 'सर्फ रोशी की तमन्ना' केली म्हणूनच हिंदुस्थान स्वातंत्र्य झाला. म्हणूनच प्रख्यात कवी म्हणतात :

**ए मेरे वतन के लोगो-**
**जरा आंखमे भरलो पानी**
**जो शहिद हुए है उनकी**
**जरा याद करो कुर्बानी -**
**जब अंत समय आया तो**
**कह गये के अब चलते है**
**खुश रहना देश के प्यारों**
**अब हम तो सफर करते है...**

ज्या मोजक्याच परकीयांना महान हिंदू संस्कृतीचे सार समजले आणि ज्यांनी गुलामगिरीत जगणाऱ्या हिंदुस्थानीकांची अस्मिता जागृत केली त्यातले एक थोर परकीय म्हणजे ॲलन ऑक्टोव्हीन ह्युम.